आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ एप्रिल २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस
- आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर अवैध दारू, अंमली पदार्थ, रोकड, इत्यादींचा ओघ रोखण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निवडणूक आयोगाचे सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना निर्देश
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून आणखी चार उमेदवारांच्या नावांची घोषणा / भाजपाचे उन्मेष पाटील उद्धव ठाकरे यांच्या पक्षात दाखल
- यंदा भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होणार असल्याचा जागतिक बँकेचा सुधारित अंदाज
- तैवानमधे झालेल्या मोठ्या तीव्रतेच्या भूकंपात ९ जणांचा मृत्यू, ८०० हून अधिक जखमी

**आणि**

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सची तडाखेबंद सुरुवात

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. यात केरळमधल्या २०, कर्नाटक १४, राजस्थान १३, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश प्रत्येकी ८, मध्यप्रदेश ७, आसाम आणि बिहारमधे प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि

छत्तीसगडमधे प्रत्येकी ३, तर मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू- कश्मिरमधल्या प्रत्येकी एका जागेचा समावेश आहे.

उमेदवारी अर्जांची छाननी पाच एप्रिलला होईल. जम्मू-कश्मिरमधे मात्र एकदिवस उशीरा, म्हणजेच ६ एप्रिलला छाननी होईल. या टप्प्यासाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

पहिल्या टप्प्यात निवडणूक होणार असलेल्या बाह्य मणिपूर लोकसभा मतदार संघातल्या काही भागांमधेही २६ एप्रिललाच मतदान होणार आहे.

<><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर अवैध दारू, रोख रक्कम, अंमली पदार्थ आणि मोफत वस्तुंचा ओघ रोखण्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्याचे निर्देश निवडणूक आयोगानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत. निवडणूक आयोगानं या संदर्भात सर्व राज्यातले मुख्य्य सचीव, पोलीस महानिदेशकांबरोबर आज नवी दिल्ली इथं आढावा बैठक घेतली. तसंच महाराष्ट्रासह ११ राज्यातल्या संवेदनशील मतदान केंद्रावर केल्या जाणाऱ्या विशेष व्यवस्थेसंदर्भातही या बैठकीत चर्चा करण्यात आली. यावेळी मुख्य्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार, सुखबीर सिंग संधू उपस्थित होते.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज लोकसभा निवडणुकांसाठी चार उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. कल्याणमधून वैशाली दरेकर, पालघरमधून भारती कामडी, जळगावमधून करण पवार आणि हातकणंगलेमधून सत्यजित पाटील यांना उमेदवारी दिल्याचं पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलं.

<><><><><>

जळगावचे भाजपाचे खासदार उन्मेष पाटील यांनी अनेक पदाधिकाऱ्यांसह आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. पाटील यांना जळगाव लोकसभा मतदारसंघातून भाजपाची उमेदवारी मिळाली नसल्यामुळं ते गेल्या काही दिवसांपासून नाराज होते.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नमो ॲपच्या माध्यमातून डिजिटल रॅलीत सहभागी झाले. उत्तर प्रदेशात तिसऱ्या टप्प्यात निवडणूक होणाऱ्या संभल, बदांयू, बरेली, आंवला, एटा, हाथरस, आगरा, फतेहपुर सीकरी, फिरोजाबाद आणि मैनपुरी या मतदारसंघातले भाजपा कार्यकर्ते २२ हजार ६४८ कार्यकर्ते या प्रचारसभेला उपस्थित होते. भाजपा कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून विरोधी पक्षनेते हतबल झाल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

<><><><><>

भ्रष्टाचारी लोक सध्या एकत्र आले असले, तरी भ्रष्टाचाऱ्यांना तुरुंगात पाठवण्यापासून कुणीही थांबवू शकत नाही, असं भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज उत्तर प्रदेशात मुजफ्फरनगर इथं जाहीर सभेत बोलत होते. राष्ट्रीय लोकदलाचे नेते जयंत चौधरी या सभेला उपस्थित होते. या सभेनंतर शाह यांनी मुरादाबाद इथं लोकसभा गाभा गटाच्या बैठकीलाही हजेरी लावली.

<><><><><>

हरियाणातल्या कर्नाल विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यासाठी निवडणूक आयोगानं जारी केलेल्या अधिसूचनेला आव्हान देणारी याचिका पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयानं फेटाळली. माजी मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर

यांनी राजीनामा दिल्यामुळे ही जागा रिक्त झाली आहे. नवे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी सध्या हरियाणा विधानसभेचे सदस्य नसल्यानं ते या जागेवरुन निवडणूक लढवत आहेत.

<><><><>

केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं एका रोड शोचं नेतृत्व केलं. त्यांच्यासोबत पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते उपस्थित होते.

तिरुवअनंतपुरम लोकसभा मतदारसंघातून संयुक्त लोकशाही आघाडीचे उमेदवार म्हणून काँग्रेस नेते शशी थरुर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

<><><><>

लोकसभा निवडणुकीसाठी बहुजन समाज पक्षानं तिसरी उमेदवारी यादी जाहीर केली आहे. १२ उमेदवारांचा समावेश आहे. बसपानं आतापर्यंत उत्तर प्रदेशातल्या एकूण ८० मतदारसंघांपैकी ३७ जागांवरचे उमेदवार जाहीर केले आहेत.

<><><><>

२०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होईल, असा सुधारित अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. जागतिक बँकेनं आधी या वर्षासाठी जो अंदाज व्यक्त केला होता त्यात एक पूर्णांक दोन दशांश टक्क्यांची वाढ करून हा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला आहे. दक्षिण आशिया विकासासंदर्भातल्या ताज्या अहवालात ही माहिती दिली आहे. येत्या दोन वर्षांत दक्षिण आशिया हा विभाग जागतिक पातळीवर सर्वाधिक

विकसनशील विभाग ठरेल, आणि २०२५ या वर्षात त्याचा विकासदर सहा पूर्णांक एक दशांश टक्के असेल, असंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तैवानच्या पूर्व किनारपट्टीलगत आज सकाळी झालेल्या ७ पूर्णांक ४ दशांश रीक्टर स्केलच्या भूकंपाला बळी पडलेल्या तैवानी नागरिकांची संख्या ९ पर्यंत पोचली आहे. त्या व्यतिरिक्त ८०० हुन अधिक नागरिक जखमी झाले आहेत. या भूकंपाची झळ डोंगराळ प्रदेशासह तैवानची राजधानी असलेल्या तैपेयी शहरालाही बसली. या भूकंपामुळे मोठ्या प्रमाणात भूस्खलन झालं असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या भूकंपाच्या तडाख्यात सापडलेल्या शंभरेक नागरिकांचा शोध घेण्याची मोहीम अद्याप सुरु आहे.

दरम्यान या भूकंपामुळं तैवानच्या शेजारच्या देशांमध्ये सुनामी लाटा उसळण्याची शक्यता असून जपानसह इतर देशांना त्याबाबत इशारा देण्यात आला आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या भूकंपाला बळी पडलेल्या नागरिकांबाबत शोक व्यक्त केला आहे. या भूकंपाचा नेटानं सामना करून त्यातून सावरण्याचा प्रयत्न करत असलेल्या तैवानी नागरिकांना भारत पूर्ण पाठिंबा देणार असल्याचं, मोदी यांनी समाज माध्यमांवरच्या एका संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उद्या मुंबई भेटीवर येत आहेत. या दौऱ्यात त्या आयआयटी मुंबईमधे कर्करोगावरच्या भारताच्या पहिल्या देशांतर्गत विकसित उपचार पद्धतींचा प्रारंभ करणार आहेत.

**<><><><><>**

लोकसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी बिहारमधल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या प्रचाराची सुरुवात उद्या जामुई जिल्ह्यातून करणार आहेत. खैरा तालुक्यात बल्लोपूर इथं होणाऱ्या प्रचार सभेला मोदी संबोधित करणार आहेत. या सभेला बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यासह लोकशाही आघाडीचे इतर नेते आणि उमेदवार उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं वाय एस राजशेखर रेड्डी क्रिकेट स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईट राईडर्स यांच्यात सामना सुरु आहे. कोलकाता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून, प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकाता नाईट रायडर्सच्या ८ षटकात १ बाद ११२ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

काँग्रेसचे माजी खासदार हनुमानहड शंकर पन्नू. माजी आमदार जे पी चंडेलीया, माजी उपप्रदेशाध्यक्ष यांच्यासह कार्यकर्त्यांनी आज भाजपाच्या राजस्तानच्या उपप्रभारी विजया रहाटकर यांच्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राजस्तानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्या कार्यपद्धतीला कंटाळून पक्षत्याग करत असल्याचं यावेळी चंडेलिया यांनी सांगितलं.

<><><><><>

देशभरातल्या जनतेसाठी काँग्रेसनं ५ न्याय आणि २५ गॅरंटी दिल्या आहेत, हा संदेश राज्यात घरोघरी जाऊन पोहचवला जाईल, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज दिली. मुंबईत टिळक भवन इथं काँग्रेसच्या प्रचार समिती आणि समन्वय समितीची बैठक झाल्यानंतर ते बोलत होते.काँग्रेसनं

महिला, युवा, कामगार, शेतकरी, हिस्सेदारी न्याय असा संकल्प जाहीर केला आहे, असं पटोले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

औषधांच्या किमतीत लक्षणीय वाढ झाल्याचं वृत्त खोटं आणि दिशाभूल करणारं असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे. सुमारे ७८२ औषधांच्या घाऊक किंमतींत कोणताही बदल होणार नाही तर ५४ औषधांच्या किंमतींमध्ये एक पैशाची वाढ होणार असल्याचं आरोग्य मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या उद्याच्या भागात आपण भंडारा-गोंदिया लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**//<><><><><>//**